# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

अपिल क्रमांक ०४/२०१२

सुनावणी दिनांक ५/१०/२०१२

श्री आनंद नाना केदारे (शिंदेकर)
९५/८८२, रमाबाई आंबेडकर नगर,
घाटकोपर, मुंबई-४०० ०७५ ... अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई ... प्रतिवादी

## आदेश

अपिल करणार यांनी जन माहिती अधिकारी, आस्थापना यांनी, त्यांच्या दिनांक १६/०८/२०१२ च्या मूळ अर्जावर अपुरी माहिती दिली या कारणास्तव दिनांक २०/०९/२०१२ रोजी अपिल सादर केलेले आहे. मूळ अर्जामध्ये अपिल करणार यांनी ४ मुद्दयांवर माहिती मागितलेली होती. सदरहू मुद्दयांवर व आस्थापना व लेखाशाखेने अनुक्रमे दिनांक ०५/०९/२०१२ व १०/०९/२०१२ च्या पत्रांद्वारे लेखी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. अपील करणार यांना सदरहू दोन्ही पत्रांद्वारे पाठविण्यात आलेली माहिती मिळाली असल्याचे सुनावणीच्या दरम्यान त्यांनी मान्य केले.

१. अपिल करणार यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या,जनसंपर्क अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याचे नाव व त्यांनी कार्यभार स्वीकारल्याच्या तारखेसह मागितलेली माहिती :- आस्थापनाशाखेने दिनांक ०५/०९/२०१२ च्या पत्रान्वये अशी स्पष्ट माहिती दिली की, श्री. संजय प्रभाकर भुस्कुटे हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील जनसंपर्क अधिकारी या पदावर दिनांक १९/०५/२००५

पासून विविध कालावधीसाठी कंत्राटी तत्वावर कार्यरत आहेत. त्यांच्या कंत्राटी तत्वावरील नेमणूकीबाबत वेळोवेळी वेगवेगळे आदेश निर्गमित करण्यात आलेले असून, ज्यावेळी पूर्वीच्या आदेशातील कालावधी संपला, त्यावेळी त्यांना, त्यांच्या कामकाजामध्ये खंड देऊन पुढील स्वतंत्र आदेश काढण्यात आलेले आहेत. अपिल करणार यांनी सुनावणीच्या दरम्यान सदरहू माहिती मिळाली असल्यामुळे त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे स्पष्ट केले.

२. म. प्र. नि. मंडळाने जनसंपर्क अधिकारी हे पद (कायमस्वरुपी अथवा कंत्राटी पध्दतीवर) मंजूर करताना शासनाकडून मिळालेल्या मान्यता पत्राची छायांकित प्रत मागितलेली होती :- आस्थापनाशाखेने दिनांक ०५/०९/२०१२ च्या पत्राद्वारे सदरहू पदास शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही, असे स्पष्ट कळविले असून, त्या माहितीबाबत अपिल करणार यांची कोणतीही तक्रार नाही, मात्र सदरहू पदास शासनाची मान्यता नसल्यामुळे अपिल करणार यांची त्याबाबत तक्रार आहे. अपिल करणार यांनी श्री. संजय भुस्कुटे यांच्या नेमणूकीबाबत म. प्र. नि. मंडळाच्या मान्यतेची आणि सध्याच्या कालावधीची नेमणूकीच्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत सुनावणी दरम्यान विनंती केली. त्यानुसार लगेचच सदरहू माहिती सुनावणीनंतर उपलब्ध करुन देत आहे, असे आस्थापनाशाखेमार्फत स्पष्ट करण्यात आले.

३. कंत्राटी पध्दतीवरील अधिकाऱ्याला आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार आहे का ?, असल्यास कोणत्या अधिनियमान्वयें अधिकार देण्यात आला, याबाबत मागितलेली माहिती :-

माहिती अधिकारी, लेखाशाखा यांनी दिनांक १०/०९/२०१२ च्या पत्राद्वारे अपिल करणार यांनी मागितलेल्या लेखाशाखेसंबंधी मुद्दा क्रमांक ३ व ४ संदर्भात माहिती दिली असल्याचे स्पष्ट केले.

त्यामध्ये असे स्पष्ट करण्यात आले की, कंत्राटी पध्दतीवरील अधिकाऱ्यास आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार नसतो, परंतु ते मंजूरीकरिता सदरहू प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर करु शकतात.

अपिल करणार यांनी सदरहू माहितीबाबत असे स्पष्ट केले की, याबाबत जे प्रस्ताव जनसंपर्क अधिकारी (श्री. संजय भुस्कुटे) यांनी वरिष्ठांकडे मंजूरीसाठी सादर केले, त्या प्रस्तावांची त्यांना पाहणी करावयाची आहे. त्याप्रमाणे चर्चेअंती सदरहू प्रस्तावांची व मंजूरींची धारिकेमध्ये पाहणी करण्यास अपिल करणार यांनी मान्यता दिली. तसेच असे ठरले की, माहिती अधिकारी, लेखाशाखा आणि जनसंपर्क अधिकारी, म. प्र. नि. मंडळ यांच्या सोयीप्रमाणे, अपिल करणार यांना

पुढील १५ दिवसातील योग्य ती तारीख व वेळ निश्चित करुन सदरहू माहितीचे निरीक्षण करण्यास धारिका उपलब्ध करुन दिली जाईल.

येणेप्रमाणे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक ०५/१०/२०१२ रोजी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )
प्रथम अपिलीय अधिकारी

लेखा अधिकारी (आस्थापना शाखा)
(श्रीमती सुजाता शेलके)

जन माहिती अधिकारी (लेखा विभाग) ०५/१०/१२
श्री. अ. हु. पाटील

सहाय्यक माहिती अधिकारी (लेखा विभाग) ५/१०/२०१२
सौ. अरुणा आशिष [illegible]

जन माहिती अधिकारी (आस्थापना विभाग) ०५/१०/१२
श्रीमती तृप्ती प्र. लब्बेडकर (प्र. ले. पा)

श्री आनंद नाना कोयारे (शिपाई)